पाक्षिक


# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 6 ● 16 मार्च 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



शेतकऱ्यांचा सखा





ग्रामीण पशुधन उद्योजक योजना



नदीजोड प्रकल्प



वाढवण बंदर



पायाभूत सुविधा विकास



महिला सक्षमीकरणाच्या योजना

## महाराष्ट्राचा अर्थसंकल्प

# बळीराजाची कर्जमुक्ती




स्टार्टअपमध्ये नंबर १



आरोग्य आयुक्तालयाची स्थापना




अध्यक्षीय मनोगत

# विरोधकांच्या खोट्या प्रचाराला उत्तर द्या

अमेरिका, इस्त्राइल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या निमित्ताने देशातील विरोधी पक्षांचे खरे चेहरे पुन्हा एकदा जनतेपुढे आले आहेत. या युद्धामुळे झालेल्या इंधन टंचाईचा फटका जगातील अनेक देशांना बसला आहे. या टंचाईतून मार्ग काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे सर्व सहकारी अथक प्रयत्न करीत आहेत. भारताला आखाती देशांकडून पुरेसा इंधन पुरवठा व्हावा यासाठी मोदी सरकारने केलेल्या प्रयत्नांना यश मिळत आहे. हे संकट देशापुढचे आहे. अशा प्रसंगात विरोधी पक्षांनी सरकारला विरोध करताना आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक असते. मात्र काँग्रेस आणि उबाठासारख्या पक्षांना याची मुळीच जाणीव नाही, असे दिसून आले आहे. युद्ध सुरू झाल्या-झाल्या काँग्रेसने गल्लीपासून दिल्लीपर्यंत गॅस टंचाई विरोधात आंदोलन सुरू केले. गॅस टंचाईबाबत खोटी-नाटी माहिती पसरवून सामान्य माणसामध्ये घबराट निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेस नेतृत्वाने केला. त्यासाठी समाज माध्यमांवरून गॅस टंचाईबाबत खोटी माहिती देणारे संदेश देशभर पसरवले गेले. त्यामुळे अनेक ठिकाणी गॅस सिलेंडर मिळण्यासाठी लोकांनी रांगा लावल्या. या परिस्थितीतही घरगुती गॅस पुरवठा विस्कळीत झालेला नाही. अशा प्रसंगामध्ये विरोधी पक्षांनी राजकारण बाजूला ठेऊन जनतेला संकटामध्ये मदत करण्याची भूमिका बजावणे अपेक्षित असते. मात्र काँग्रेस नेतृत्व नरेंद्र मोदी यांना विरोध करण्याच्या हट्टामुळे आपल्या देशातील जनतेला संकटात आणण्याचे उद्योग करू लागले आहे. देशात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा असून त्याच्या किमतीमध्ये वाढ झालेली नाही. काही दिवसांपूर्वी घरगुती गॅसच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली. मात्र त्यापूर्वी घरगुती गॅसच्या किमती दोनदा कमी करण्यात आल्या होत्या. याकडे दुर्लक्ष करून काँग्रेसने या दरवाढीविरोधात आंदोलन केले. ३० ऑगस्ट २०२३ रोजी घरगुती गॅसच्या किमतीत २०० रुपये तर ८ मार्च २०२४ रोजी १०० रुपये अशी एकूण ३०० रुपयांची कपात करण्यात आली. इराण युद्धामुळे आयात होणाऱ्या एलपीजीचा दर वाढल्यामुळे ६० रुपयांची दरवाढ करावी लागली. या युद्धाची झळ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सर्वांना बसणार हे सामान्य माणसालाही माहीत आहे. त्याचे राजकारण करून समाजात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होत आहे. या परिस्थितीत आपल्या कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी विरोधकांच्या खोट्या प्रचाराला सामान्य जनतेत जाऊन उत्तर दिले पाहिजे.

सध्या आपले प्रशिक्षण अभियान राज्यभर सुरू आहे. या अभियानातील प्रमुख विषय मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणीचा आहे. त्यातून बोगस आणि घुसखोर मतदारांची नावे काढून टाकण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर आपल्या समर्थक मतदारांची नावे मतदार यादीत नसल्यास ती समाविष्ट करण्याची संधीही मिळणार आहे. या अभियानात पक्षातर्फे नेमल्या जाणाऱ्या बूथ लेवल एजंट आणि बूथ समितीतील सर्व सदस्यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. या अभियानात सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी ताकदीने सहभागी झाले पाहिजे. मतदार याद्यांच्या पडताळणीमध्ये कार्यकर्त्यांनी कोणती कामे करावयाची आहेत, या विषयी सविस्तर मार्गदर्शन करणारी पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार आपल्याला जागरूक राहून हे अभियान यशस्वी करावयाचे आहे.

**रविंद्र चव्हाण**




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना
विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) :
श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड,
प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

# अंतरंग

बळीराजाचा सखा, शेतकरी कर्जमाफीची घोषणा ०४



महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सर्वात मोठी १०



राहुल गांधींच्या नौटंकीचा बुरखा टराटरा फाडला १२



हडपसर-यवत मार्गावर सहापदरी उड्डाणपूल २४



धारावीखालून वांद्रे टर्मिनसपर्यंत भुयारी मार्ग २७



शहरांच्या विकासासाठी भांडवली बाजारातील ‘बाँड’ ३०




हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# बळीराजाचा सखा
# शेतकरी कर्जमाफीची घोषणा

- ७.६९ लाख कोटींचा विकासाभिमुख अर्थसंकल्प.
- शेतकरी कर्जमाफी, नदीजोड प्रकल्प, तिसरी मुंबई आणि स्टार्टअपला चालना.
- राज्याची 'विकसित महाराष्ट्र'च्या दिशेने यशस्वी घौडदौड.
- एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावांना काँक्रिट रस्त्याने जोडणार.



राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आलेला २०२६-२७ वर्षाचा ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प 'विकसित महाराष्ट्र' या ध्येयावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. प्रगतीशील विकास, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित हा अर्थसंकल्प राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि पायाभूत विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिलासा देणारा कर्जमाफीचा निर्णय जाहीर केला.

**विधानसभेत** राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळ सदस्य, विधानसभा सदस्य उपस्थित होते.

### राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाला गती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरच्या टप्प्यावर पोहोचवण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. या उद्दिष्टासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

### शेतकऱ्यांना दिलासा : कर्जमाफीची घोषणा



राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्यात येईल. जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार असून कृषी समृद्धी योजनेंतर्गत २०२६-२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवणार आहे. तसेच नवीन प्राकृतिक शेती अभियानात ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्यात येईल.

### २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार



महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती ११ एप्रिल २०२६ यावर्षी आहे. त्यासाठी एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येईल, त्यासाठी निधी देणार असून महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करणार आहे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविण्यात येणार आहे. ७५ गावांत 'एआय'च्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार असून महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींचे विशेष वर्ष म्हणून २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार

असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जगद्गुरु तुकाराम महाराजांचे देहू येथील घर आणि जन्मस्थानाचे जतन, संवर्धनासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे. नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करण्यात येणार आहे. नव्यापिढीला महाकवी कालिदास यांच्या साहित्याची ओळख व्हावी, त्यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. रामटेक विकास आराखडा टप्पा-२ ची कामे करणार असून पंढरपूर मंदिर विकास आराखड्यातील पुढील कामे हाती घेणार असून ५ ज्योतिर्लिंग विकासाची कामे सुरु असून महानुभाव पंथीय विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुविधांसाठी निधी देणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून राज्य शासन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असून अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### नवीन मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना



राज्य आणि जिल्हा योजनांचे एकत्रिकरण करुन पशुधनात स्वयंपूर्णता, रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त गो-पालक, कुक्कुटपालक व शेळीपालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम सुरु करणार असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये प्रतिवर्षी १,२४० कोटी रुपये देण्यात येणार आहे, त्याचा २०,५९४ मासेमारांना लाभ मिळेल.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरु राहणार असून यासाठी यंदा सुमारे २०,००० कोटींची तरतूद असून फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३२,७५६ कोटी रुपये दिले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये १६ हजार मे.वॅ. ऊर्जा क्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट असून, यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा तसेच डिसेंबर २०२६ पर्यंत १० हजार मे.वॅ. क्षमता स्थापित होणार आहे. सध्या ३३४९ मे.वॅ. क्षमता स्थापित आहे. तर मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेत आतापर्यंत ६,६३,३२४ सौर कृषीपंप दिले असून सौर कृषीपंप अंमलबजावणीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकवर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

शेती क्षेत्र अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी यांसारख्या डिजिटल प्रणालींच्या माध्यमातून एकात्मिक डिजिटल कृषी व्यवस्था उभारली जाणार आहे. राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित नवोपक्रम केंद्रे सुरु करण्यात येणार असून त्यामुळे शेती उत्पादन खर्चात लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे.

### नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य



राज्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी मोठ्या नदीजोड प्रकल्पांवर भर देण्यात आला आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४,९६८ कोटी रुपये, तर दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३,४९७ कोटी रुपये खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पांमुळे सिंचनक्षमता वाढण्यासोबतच पाणीटंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे.


याशिवाय कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरनियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने २,२४० कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.



### महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम

या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकल महिला धोरण राबवण्यात येणार असून त्यासाठी  सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणण्यात येईल. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारच्या विविध योजनांनाही अर्थसंकल्पात चालना देण्यात आली आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू ठेवण्यात येणार असून महिला बचतगटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारले जाणार आहेत. राज्यात आतापर्यंत ३७ लाख 'लखपती दीदी' तयार झाल्या असून पुढील काळात आणखी २५ लाख महिलांना लखपती बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

### शिक्षण आणि स्टार्टअपसाठी नवे धोरण



युवकांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी नवी मुंबई येथे 'एज्युसिटी' उभारण्याची योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठे सुरू होणार नवी मुंबईत ६ देशांतील विद्यापीठे याचवर्षी सुरु होणार आहेत. याच धर्तीवर ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करणार असून भविष्यात राज्यात ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करण्याचा मानस आहे.

स्टार्टअप आणि नवउद्योजकतेला चालना देण्यासाठी पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक तयार करणे आणि ५० हजार स्टार्टअप उभारणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी योजनेंतर्गत इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी या योजनेतून मिळेल.

### महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड ॲडव्हान्समेंट (महिमा) या संस्थेची स्थापना

परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन यासाठी 'महिमा' संस्थेतून मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच समुपदेशन सेवा विस्तार आणि अधिक संघटित व्यवस्थेसाठी ३६ नवदिशा केंद्र स्थापन करण्यात येईल.

### स्टार्टअप, युनिकॉर्नमध्ये महाराष्ट्र नंबर १

पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक घडवणार, ५० हजार स्टार्टअपला बळ देणार असून मुख्यमंत्री उद्योजकता महाफंडमधून स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत देण्यात येणार असून सर्वोत्तम ५० स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण प्रकल्प शासनात




राबविण्यासाठी २५ लाखांपर्यंतच्या शासकीय कामाचे थेट वर्कऑर्डर्स मिळतील.

### मिशन लक्ष्यवेध

ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटिंग, रोईंग, सेलिंग, लॉनटेनिस, टेबल टेनिस या १२ खेळांचे राज्य स्तरावर ८ हायपरफॉर्मन्स

सेंटर्स सुरु असून आता आणखी ४ केंद्र सुरु करणार असून विभागीय स्तरावर २५ क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हा स्तरावर ९६ क्रीडा गुणवत्ता विकास केंद्र सुरु करणार आहोत, यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### सामाजिक न्याय



सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी मोठी तरतूद करण्यात आली असून अनुसूचित जातींसाठी २३,१५० कोटी रुपये, तर आदिवासी घटकांसाठी २१,७२३ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे.

आरोग्य क्षेत्रात नागपूर येथे 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्यात येणार असून ग्रामीण भागातील गंभीर आजारांच्या निदानासाठी ४,५०० कोटी रुपयांची योजना राबविण्यात येणार आहे. ओबीसी, धनगर, गोवारी घटकांसाठी भरीव तरतूद केली असून सारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत, मार्टी या संस्थांसाठी भरीव तरतूद केली आहे. दिव्यांगांसाठी सर्व सुविधा एका ठिकाणी आणण्यासाठी दिव्यांग सहाय्यक संकेतस्थळ, जिल्हा वार्षिक योजनेत १ टक्के निधी राखीव असेल तसेच तृतीयपंथियांच्या विकासासाठी स्वयंरोजगार, व्यवसायासाठी बीजभांडवल देणार आहे. आकांक्षित जिल्हे आणि तालुके कार्यक्रमाचा विस्तार करणार असून गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशीम जिल्ह्यांसोबत आता हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे, परभणी या ६ नवीन जिल्ह्यांचा समावेश करण्यात येईल. या एकूण १० जिल्ह्यातील ७७ तालुके आणि उर्वरित जिल्ह्यातील १०० तालुक्यांचा गतिमान विकास करण्यात येईल.

### 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता–बिरसा' योजनेची सुरुवात

चर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र मुंबईतील वांद्रे येथे स्थापन करणार असून आदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक, उद्योग निर्माते घडविण्यासाठी 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता–बिरसा' ही योजना सुरु करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### आरोग्य आयुक्तालयाची स्थापना



आरोग्य क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी राज्यातील २९ महापालिका, २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही संस्था 'एम्स' आणि 'आयआयएम'च्या धर्तीवर कार्य करणार असून भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेचे सहकार्य मिळणार आहे. ग्रामीण भागात कर्करोग, मधुमेह आणि हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान आणि उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीने ४५०० कोटी रुपयांची प्रगती योजना राबविण्यात येणार आहे. राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य प्रणाली उभारण्यासाठी 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' सुरु करण्यात येणार असून रिअल–टाइम डॅशबोर्डद्वारे आरोग्य व्यवस्थेचे प्रभावी नियोजन आणि नियंत्रण केले जाणार आहे.

राज्यात सध्या ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून आणखी ११ महाविद्यालयांची कामे विविध टप्प्यांवर सुरू आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचारांच्या संख्येत मोठी वाढ करण्यात आली असून उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ इतकी करण्यात आली आहे. तसेच या योजनेंतर्गत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४५३७ इतकी वाढवण्यात आली आहे. अवयव प्रत्यारोपणासारख्या उपचारांसाठी २२ लाख रुपयांपर्यंतचा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या

राखीव निधीतून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

बीड जिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे नवीन रुग्णालय, नर्सिंग कॉलेज आणि वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव आहे. तसेच सातारा जिल्ह्यातील दरे येथे निसर्गोपचार केंद्र उभारण्यात येणार असून ताणतणाव, मानसिक आरोग्य आणि जीवनशैलीजन्य आजारांवर उपचारासाठी ते उपयुक्त ठरणार आहे. याशिवाय मुंबई महानगर परिसरात सर्वांगिण आरोग्य आणि वेलनेसचे जागतिक केंद्र उभारण्याचाही प्रस्ताव आहे.

आर्थिक क्षेत्रात राज्याची अर्थव्यवस्था वेगाने वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्याचा कृषी क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्ज डॉलर्सवरून ५०० अब्ज डॉलर्स, उद्योग क्षेत्राचे उत्पादन १२३ अब्ज डॉलर्सवरून १५०० अब्ज डॉलर्स, तर सेवा क्षेत्राचे उत्पादन ३१२ अब्ज डॉलर्सवरून ३००० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

## पायाभूत सुविधांच्या व्यापक योजना



राज्यातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील ठाणे, विरार आणि बोईसर स्थानके २०२७ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अटल सेतू परिसरात सुमारे २०० चौरस किलोमीटर क्षेत्रात 'तिसरी मुंबई' विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय वाढवण बंदर प्रकल्पामुळे सुमारे १२ लाख रोजगारनिर्मिती होईल.

राज्यात शाश्वत शहरी विकासासाठी १० पेक्षा अधिक प्रादेशिक विकास प्राधिकरणे आणि ५० पेक्षा अधिक नियोजित शहरी समूह विकसित करण्यात येणार आहेत. जलवाहतुकीला चालना देण्यासाठी राज्यातील १२५ किलोमीटर जलमार्गाचे जाळे ३४० किलोमीटरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून २१ जलमार्गांवरील २० टर्मिनल्सचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

## वाढवण बंदराच्या विकासातून १२ लाखांहून अधिक रोजगार निर्माण




मुंबई महानगर परिसरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्याचीही योजना आहे. वडाळा येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हब उभारण्यात येणार आहे. तसेच अटल सेतूला जोडून सुमारे २०० चौरस किलोमीटर क्षेत्रात 'तिसरी मुंबई' विकसित करण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. कर्नाळा, साई आणि चिरनेर नवनगर तसेच नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्रात ही ग्रीनफिल्ड शहरे उभारली जाणार आहेत.

याशिवाय वाढवण बंदराच्या विकासातून १२ लाखांहून अधिक रोजगार निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून लॉजिस्टिक्स आणि वेअरहाऊसिंगसाठी मोठे केंद्र उभारण्याची योजना आहे. मुंबई महानगर प्रदेशातील २० लाख झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास आणि १० लाख परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याचाही सरकारचा मानस आहे. राज्यातील मेट्रो आणि द्रुतगती मार्गांच्या जाळ्यालाही मोठा विस्तार देण्यात येणार आहे. राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० किलोमीटरपर्यंत वाढवण्याचे, तसेच ६००० किलोमीटरपेक्षा अधिक द्रुतगती मार्गांचे जाळे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासनाला यश

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महसुली उत्पन्न ६,१६,०९९ कोटी रुपये, तर महसुली खर्च ६,५६,६५१ कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. यामुळे सुमारे ४०,५५२ कोटी रुपयांची महसुली तूट राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तरीही राज्याची राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासनाला यश आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ■

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सर्वात मोठी




पहिल्या ३५ देशांचा आपण विचार केला... तर ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाइन्स, व्हिएतनाम, बांगलादेश या सगळ्या देशांपेक्षा आपली अर्थव्यवस्था मोठी आहे.

- जर आपण आपला विकासदर कायम ठेवू शकलो तर पुढच्या २ ते ३ वर्षात संयुक्त अरब अमिराती (UE) आणि सिंगापूरच्या अर्थ व्यवस्थेला देखील आपण मागे टाकू. आपला विस्तार त्यांच्या पेक्षा ही मोठा होईल.
- २०१३-१४ साली आपल्या राज्याचा एकूण जीडीपी १६ लाख कोटी होता.
- गेल्या १० वर्षात आम्ही १६ लाख कोटीवरून ५१ लाख कोटी रुपयांवर पोहचलो आहे.
- तीपटीपेक्षा जास्त आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार झालेला आपल्याला दिसतो.
- सरत्या वर्षात देशाच्या जीडीपी पेक्षा आपली जीडीपी वाढ जास्त आहे.
- आपण ७.९ टक्के या दाराने विकसित झालो आहोत. हा स्थिर किमतीवर आहे आणि चालू किमतींचा आपण विचार केला तर १०.०४ टक्के महाराष्ट्राचा विकासदर आहे.
- राज्याचे दरडोई उत्पन्न ३ लाख १७ हजार ८०० रुपयांवरून ३ लाख ४७ हजार ९०३ रुपये वाढले.
- दरडोई उत्पन्नात मोठ्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र ५ व्या क्रमांकवर आहे.
- जेवढे मोठे राज्य तेवढा विकास दर कमी असतो.
- महाराष्ट्राची लोकसंख्या देशाच्या ९.५ टक्के आहे.
- देशाच्या GDPमध्ये महाराष्ट्राचा हिस्सा १४.९टक्के आहे.

## मागील वर्षात महायुती सरकारने महिला वर्गासाठी केलेल्या विशेष तरतुदी

● लेक लाडकीयोजनेअंतर्गत १ लाख १३ हजार लाभार्थींना थेट लाभ देण्यात आला. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता ५० कोटी ५५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

● मुलींच्या व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात आली.

● मान्यताप्राप्त उच्च आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आणि ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थिनींना हा लाभ देण्यात येतो.

● मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणयोजनेकरीता ३६ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन.

● दीनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत सुमारे २२ लाख महिलांना लखपती दिदीहोण्याचा मान मिळाला असून, सन २०२५-२६ मध्ये आणखी २४ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट शासनाने निर्धारित केले होते.

● बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक उमेद मॉल उभारण्याचे शासनाने ठरवले.

● देशाच्या GDP मध्ये सर्वाधिक हिस्सा असणारे राज्य महाराष्ट्र आहे.

● देशातील FDI मध्ये आपण क्रमांक १ वर आहोत, ऑईल व्यतिरिक्त निर्यातीत आपण क्रमांक १ वर आहोत, देशाच्या स्टार्ट-अपमध्ये आपण क्रमांक १ वर आहोत, देशाच्या युनिकॉर्नमध्ये आपण क्रमांक १ वर आहोत, बँकेच्या ठेवीत आपण क्रमांक १ वर आहोत, GST संकलनात आपण क्रमांक १ वर आहोत. इतकेच नाही तर देशाच्या 'फॉरेस्ट ऑफ इंडिया' अहवालानुसार 'वृक्ष आच्छादनात' ही आपण क्रमांक १ वर आहोत.

● जेव्हा आपले उत्पन्न १६ लाख कोटी होते तेव्हा आपल्यावरचे कर्ज जवळपास ३ लाख कोटी होते.

● आज आपले उत्पन्न ५१ लाख कोटी आहे आणि आपले कर्ज ९.३२ लाख कोटी आहे.

● त्यामुळे आपण ज्यावेळी वाढलेल्या कर्जाचा आकडा सांगतो त्यावेळी वाढलेल्या उत्पन्नाचा आकडा सांगताना आपण आखडता हात घेतो.

● देशात महाराष्ट्राचा 'डेट GDP रेश्यो' १८.२ टक्के आहे.

● एखाद्या राज्याची अर्थव्यवस्था चांगली याचे जे परिमाण आहेत त्यातील एक परिमाण आहे. देशाच्या सकल उत्पन्नात किती टक्के त्या राज्याचे कर्ज आहे.

● ज्यांचे कर्ज २५ टक्क्यांच्या आत आहे ती राज्ये चांगली असे आपण म्हणतो.

● महाराष्ट्र १८.१ टक्क्यांवर आहे.

● देशात महाराष्ट्रापेक्षा चांगलं डेट GDP रेश्यो दोनच राज्यांचा आहे. एक ओडीसा ज्याचे जवळपास १३ टक्के आहे आणि दुसरे गुजरात ज्यांचे १५.३ टक्के आहे.

● बाकी राज्यांचे पाहिले तर मध्यप्रदेश ३०%, राजस्थान ३६.८%, पंजाब ४६%, हरियाना २५.५%, हिमाचल प्रदेश ४९%, उत्तराखंड २८.२%, बिहार ३५%, झारखंड २७%, पश्चिम बंगाल ३८%, तेलंगाना २३.८%, कर्नाटक २३%, आंध्र प्रदेश ३३%, केरळ ३६%, तमिळनाडू २५.६%.

● कर्जाची आपल्या सकल उत्पन्नाशी तुलना केली तर महाराष्ट्र देशातील इतर राज्यांच्या तुलनेत खूप चांगल्या स्थितीत आहे.

● मोठ्या राज्याच्या तुलनेत तर निश्चितपणे आपण चांगल्या स्थितीत आहोत.

● इतर राज्य ३६ टक्क्यांवर पोहोचलेत, पण आपण केवळ १८ टक्क्यांवर आहोत.

● आपली कर्ज घेण्याची क्षमता अजून भरपूर आहे. कर्ज वाढत आहे याची चिंता करण्यापेक्षा कर्ज कुठे खर्च होत आहे याची चिंता करणे गरजेचे आहे.

**(विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.)**

# राहुल गांधींच्या नौटंकीचा बुरखा टराटरा फाडला

● सदनात बोलण्यासाठी वेळ दिला जातो तेव्हा राहुल गांधी बोलत नाहीत, पण नंतर बाहेर जाऊन त्यांना बोलू दिले नाही अशी तक्रार करतात.

● जागांच्या प्रमाणात पाहिले तर लोकसभा अध्यक्षांनी काँग्रेसला भाजपपेक्षा सहा पट जास्त बोलण्याचा वेळ दिला आहे.

● लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव विरोधकांनी आणला, पण विरोधी पक्षनेते राहुल गांधी स्वतः त्या प्रस्तावावर बोलले नाहीत.

● महत्त्वाच्या संसदीय सत्रांच्या वेळी राहुल गांधी अनेकदा जर्मनी, व्हिएतनाम, इंग्लंड, सिंगापूर आणि मलेशिया या देशांच्या दौऱ्यावर होते. परदेशातून संसदेत बोलण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची व्यवस्था नाही.

● संसदेत राहुल गांधींची उपस्थिती राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप कमी आहे.

> लोकसभा अध्यक्ष कोणत्याही पक्षाचे नसून संपूर्ण सभागृहाचे आणि सर्व सदस्यांच्या अधिकारांचे रक्षक असतात. ओम बिरला हे असे पहिले अध्यक्ष आहेत ज्यांनी नैतिकतेच्या आधारावर अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू झाल्यापासून अध्यक्षपद भूषवले नाही. विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावाच्या चुकीच्या नोटिसाही दुरुस्त करून स्वीकारल्या. त्यांच्या कार्यकाळात लोकसभेची उत्पादकता ९१% राहिली आहे. शून्यकालाची वेळ पाच तासांपर्यंत वाढवण्यात आली आणि अनेकदा रात्री १२ वाजेपर्यंत सदस्यांना प्रश्न मांडण्याची संधी दिली.



● विरोधकांच्या भाषणातील ८० टक्के भाग हा अविश्वास प्रस्तावाशी संबंधित नव्हता.

● स्पीकरच्या नावाखाली सरकारवर टीका करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

● विरोधक आणीबाणीच्या काळातील विशेषाधिकाराच्या मानसिकतेत जगत आहेत, म्हणून जनता त्यांना सतत नाकारत आहे. या विषयावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांनी सुमारे १३ तास चर्चा केली असून ४२ हून अधिक खासदारांनी त्यात सहभाग घेतला आहे. त्यांनी सांगितले की आजपर्यंत स्पीकरचा निर्णय अंतिम मानण्याची परंपरा होती; परंतु विरोधकांनी स्पीकरच्या निष्ठेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

लोकसभा ही भारताच्या लोकशाहीची सर्वात मोठी पंचायत आहे आणि भारतासह संपूर्ण जगात आपल्या लोकशाहीची प्रतिष्ठा आहे. अशा या पंचायतच्या प्रमुखाच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित झाले, तर केवळ देशातच नव्हे तर जगभरात भारताच्या लोकशाही प्रक्रियेवर प्रश्न निर्माण होतात.

सभागृह परस्पर विश्वासावर चालते आणि स्पीकर हे सत्ताधारी व विरोधी पक्ष या दोघांसाठीही सभागृहाचे संरक्षक असतात. लोकसभा कशी चालवायची यासाठी लोकसभेने काही नियम निश्चित केले आहेत. संसद ही कोणतीही मेळा किंवा जनसभा नाही; त्यामुळे नियम परवानगी देत नसतील तर कोणालाही नियम मोडून बोलण्याचा अधिकार नाही. लोकसभेच्या नियमांकडे दुर्लक्ष झाले तर ते थांबवणे आणि योग्य मार्गदर्शन करणे हे स्पीकरचे पवित्र कर्तव्य आहे. हे नियम देशाच्या पहिल्या पंतप्रधानांच्या काळापासून लागू आहेत; मात्र प्रमुख विरोधी पक्षाने अनेकदा त्यांचे उल्लंघन केले आहे. स्पीकरच्या निर्णयावर किंवा त्यांच्या निष्ठेवर शंका घेणे अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय असल्याचे त्यांनी म्हटले.

अमित शाह यांनी सांगितले की त्यांची पक्षसुद्धा पूर्वी विरोधात होती. त्या काळात तीन वेळा स्पीकरविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आले, तरी त्यांच्या पक्षाने किंवा आघाडीने कधीही असा प्रस्ताव मांडला नाही. त्यांनी रचनात्मक विरोधक म्हणून काम केले आणि स्पीकर पदाच्या प्रतिष्ठेचे रक्षण केले. तसेच आपल्या कायदेशीर अधिकारांच्या संरक्षणाची मागणी केली; परंतु स्पीकरविरुद्ध अविश्वास प्रस्ताव कधीही आणला नाही.

केंद्रीय गृह मंत्र्यांनी सांगितले की १९५४ मध्ये ग. वा. मावळंकर यांच्याविरुद्ध सोशलिस्ट पक्षाने अविश्वास प्रस्ताव आणला होता. १९६६ मध्ये तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सरदार हुकूम सिंग यांच्याविरुद्ध संयुक्त सोशलिस्ट पक्षाने प्रस्ताव आणला होता. तसेच १९८७ मध्ये बलराम जाखड यांच्याविरुद्ध कम्युनिस्ट पार्टीने अविश्वास प्रस्ताव आणला होता. या सर्व पक्षांचा आजच्या विरोधी आघाडीत काही ना काही प्रमाणात समावेश आहे. स्पीकरच्या निष्ठेवर कधीही शंका घेऊ नये, हा आमच्या पक्षाचा ठाम विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. शाह म्हणाले की लोकसभा अध्यक्षांचे महत्त्व सर्वांना माहीत आहे आणि ते विधायी न्यायशास्त्राचे सर्वोच्च न्यायाधीश मानले जातात. लोकसभा कार्यवाहीदरम्यान घेतलेल्या निर्णयांमध्ये सर्वोच्च न्यायालयही हस्तक्षेप करू शकत नाही, कारण संविधानाने त्यांना असे संरक्षण दिले आहे. हे संरक्षण स्पीकर निर्भयपणे आपले कर्तव्य पार पाडू शकतील यासाठी देण्यात आले आहे. स्पीकरचे पहिले कर्तव्य म्हणजे सभागृहातील शिस्त आणि सभ्यता राखणे आणि दुसरे कर्तव्य म्हणजे सर्व सदस्यांना संधी देत न्याय्य वागणूक देणे. लोकसभा ही तिच्या नियमांनुसारच चालली पाहिजे, हे संसदीय शिष्टाचाराचे मूलभूत तत्त्व आहे.

केंद्रीय गृह व सहकारिता मंत्र्यांनी सांगितले की लोकसभा नियम ३७४ अंतर्गत अव्यवस्था किंवा अनुशासनभंग झाल्यास स्पीकरला सदस्यांना चेतावणी देणे, नाव नोंदवणे, सभागृहातून बाहेर काढणे किंवा निलंबित करण्याचा अधिकार आहे. आंदोलन किंवा कार्यकर्तेपणाच्या पद्धती संसदेत चालत नाहीत; सभागृहातील कामकाज नियमांनुसारच चालले पाहिजे. नियम ३७५ अंतर्गत गंभीर अव्यवस्था झाल्यास सभागृह स्थगित करण्याची तरतूद आहे. नियम ३८० नुसार असंसदीय शब्द किंवा टिप्पणी कार्यवाहीतून वगळण्याचा अधिकार स्पीकरकडे आहे. असंसदीय भाष्य संसदच्या इतिहासात नोंदवू नये, कारण त्यामुळे पुढील पिढीतील खासदारांवरही त्याचा वाईट प्रभाव पडू शकतो. असंसदीय शब्दांची यादी संसद स्थापनेपासून विविध स्पीकर्सनी तयार केली असून ती सर्व सदस्यांवर बंधनकारक आहे.

अमित शाह यांनी सांगितले की, संविधानाने विरोधकांना अधिकार दिले आहेत, परंतु विशेषाधिकार दिलेले नाहीत. अधिकारांचे संरक्षण करता येते; मात्र विशेषाधिकाराच्या भ्रमात राहणाऱ्यांना त्यांच्या पक्षाकडून किंवा जनतेकडूनही संरक्षण मिळत नाही. अनुच्छेद ९६ नुसार अध्यक्षांना हटविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असताना संबंधित पीठासीन अधिकारी सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषवू शकत नाहीत. केंद्रीय गृह व सहकारिता मंत्री अमित शाह यांनी सांगितले की जेव्हा मुख्य विरोधी पक्ष सत्तेत होता, तेव्हाही तीन वेळा स्पीकरविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आले होते. त्या वेळी अशी परंपरा होती की स्पीकरविरुद्ध अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू असताना लोकसभा अध्यक्ष आसनावर बसत नाहीत; मात्र त्या तीनही वेळा स्पीकरांनी १४ दिवस अध्यक्षता केली होती. त्यांनी सांगितले की ओम बिरला हे एकमेव असे लोकसभा अध्यक्ष आहेत ज्यांनी नैतिकतेच्या आधारावर अध्यक्षस्थान स्वीकारले

नाही. नियम ९४-सी नुसार लोकसभा अध्यक्षांना केवळ अत्यंत असामान्य आणि गंभीर परिस्थितीतच हटवता येते. पंतप्रधानांना हटवण्यासाठी साधे बहुमत पुरेसे असते, पण स्पीकरला हटवण्यासाठी प्रभावी बहुमत (Effective Majority) आवश्यक असते, असेही त्यांनी सांगितले.

सभागृह कोणत्याही पक्षाच्या नियमांनुसार नाही, तर लोकसभेच्या नियमांनुसार चालते. विरोधक 'उच्च नैतिक भूमिके'ची भाषा करतात; परंतु खरे नैतिक आचरण म्हणजे दोन वेळा नियमांनुसार नसतानाही लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी विरोधकांना संधी देत नोटिसामध्ये सुधारणा करण्याची परवानगी दिली. विरोधक नियम पाळत नाहीत आणि नंतर त्यांना बोलू दिले जात नाही अशी तक्रार करतात. नियमांचे पालन करून आणि कार्यमंत्रणा समितीच्या संमतीने प्रस्ताव आणण्यात आला असताना विरोधकांनी चर्चा करण्याऐवजी सभागृहात गोंधळ घातला, यापेक्षा लाजिरवाणी घटना दुसरी असू शकत नाही. चर्चेदरम्यान विरोधकांच्या भाषणांपैकी ८० टक्क्यांहून अधिक भाषणे स्पीकरविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावाशी संबंधित नव्हती, असेही त्यांनी नमूद केले.

विरोधक म्हणतात की लोकसभेत उपाध्यक्षाची नियुक्ती झालेली नाही. त्यांनी सांगितले की एका अविश्वास प्रस्तावाच्या वेळी बलराम जाखड लोकसभा अध्यक्ष होते. त्या दोन्ही प्रस्तावांच्या वेळी लोकसभेत उपाध्यक्ष होते आणि ते पद रिक्त नव्हते; मात्र त्या काळातील सत्ताधारी पक्षाने स्वतःच्या पक्षातील नेत्यालाच उपाध्यक्ष केले होते. त्यामुळे उपाध्यक्षाचे पद रिक्त असल्याबाबत विरोधकांना बोलण्याचा अधिकार नाही.

विरोधी पक्षनेत्यांची बोलण्याची वेळ येते तेव्हा ते कधी जर्मनी, कधी व्हिएतनाम, कधी इंग्लंड, कधी मलेशिया किंवा सिंगापूर येथे असतात आणि नंतर ते तक्रार करतात. त्यांनी विचारले की जेव्हा त्यांची बोलण्याची वेळ आली, तेव्हा ते का बोलले नाहीत? स्पीकरने त्यांना रोखले होते का? लोकसभेला बदनाम करण्यासाठी कुप्रचार केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. १८व्या लोकसभेत विरोधकांना बोलण्यासाठी ७१ तासांचा वेळ देण्यात आला, परंतु त्यामध्ये विरोधी पक्षनेत्यांनी किती वेळ भाषण केले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. लोकसभा अध्यक्षांविरुद्ध आणलेल्या अविश्वास प्रस्तावावरही विरोधी पक्षनेत्यांनी काहीच भाषण केले नाही; मग त्यांनी हा प्रस्ताव आणला तरी का, असा सवाल त्यांनी केला. अमित शाह यांनी सांगितले की, विरोधी पक्षनेत्यांना बोलू दिले जात नाही, ही गोष्ट खरी नाही; उलट ते बोलू इच्छितच नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. जर त्यांना बोलायचे असेल, तर सभागृहाच्या नियमांनुसार बोलायला हवे. संसद ही जाहीर सभा नाही; प्रत्येक सदस्याने लोकसभेच्या नियमांनुसारच बोलणे आवश्यक असते. संपूर्ण देशात मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीची प्रतिमा खराब करण्यासाठी खोटी माहिती पसरवली जात आहे. असे प्रयत्न करणाऱ्यांना मी सांगू इच्छितो की, यामुळे त्यांच्या पक्षाची प्रतिमा खंडित होणार नाही. सभागृहात कोण काय बोलेल, किती बोलेल, कधी बोलेल आणि का बोलेल, याचा निर्णय सत्ताधारी पक्ष घेऊ शकत नाही. त्यांनी स्पष्ट केले की आम्ही कधीही विरोधकांचा आवाज दाबण्याचे काम केले नाही; उलट माझाच आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे.

विरोधकांचा आवाज दडपण्याचे काम १९७५ मध्ये झाले होते, जेव्हा संपूर्ण विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले होते. त्यांनी सांगितले की, नियमांनुसार सभागृह चालवण्याची जबाबदारी स्पीकरची असते. लोकसभेच्या नियम ३४९ नुसार सभागृहातील सदस्यांचे एकूण आचरण कसे असावे हे ठरवले जाते. गृह मंत्र्यांनी सांगितले की, १७ व्या लोकसभेत विरोधी पक्षाला १५७ तास ५५ मिनिटे बोलण्याची संधी देण्यात आली होती, त्यावेळी त्यांच्या सदस्यांची संख्या ५२ होती. याउलट आमच्या पक्षाला ३४९ तास ८ मिनिटांचा वेळ देण्यात आला होता, परंतु आमचे सदस्य त्यांच्यापेक्षा खूप जास्त, म्हणजे ३०३ होते. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की लोकसभा अध्यक्षांनी विरोधकांना सत्ताधारी पक्षापेक्षा जास्त वेळ दिला आहे. १७ व्या लोकसभेत विरोधकांना ४० टक्के वेळ देण्यात आला होता, तर प्रमाणानुसार (प्रो-रेटा) त्यांचा वाटा केवळ ३ टक्के होता. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाच्या चर्चेत विरोधकांना ३४ टक्के वेळ देण्यात आला आणि १८व्या लोकसभेत तो ५५ टक्क्यांपर्यंत देण्यात आला. तरीही त्यांना बोलू दिले जात नाही असे कसे म्हणता येईल, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**(केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत केलेल्या भाषणाचा संपादित अंश...)**



# शेतक-यांचे आर्थिक सशक्तीकरण

## ४८० टक्के वाढले कृषी आणि शेतकरी कल्याणचे अंदाजपत्रक

| २०१३-१४ | २०२५-२६ |
|---|---|
| २१,९३३.५० | १,२७,२९०.१६ |

(आकडे करोडो रुपयांमध्ये आहेत.)

### पंतप्रधान धन धान्य कृषी योजना



● २४,००० कोटी रूपये खर्चाच्या या 'पंतप्रधान धन-धान्य कृषी योजने'चा शुभारंभ ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

● १०० जिल्ह्यांची निवड करण्याच्या योजनेसाठी तीन मापदंड आहेत. एक शेतामध्ये किती प्रमाणात पिक पिकते, दोन- एका शेतामध्ये कितीवेळा पिके घेतली जातात आणि तीन - शेतकरी बांधवाला कर्ज अथवा गुंतवणूक करण्यासाठी किती सुविधा मिळते.

● ही योजना देशातील आकांक्षी जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी आहे. ११ मंत्रालयांच्या ३६ उप-योजनांना समन्वित करून, तिची अंमलबजावणी केली जात आहे.

● **उद्देश्य :** कृषी उत्पादनामध्ये वृद्धी, पिकांचे विविधीकरण आणि शाश्वत कृषी पद्धतींचा स्वीकार करणे. पंचायत आणि ब्लॉक स्तरावर पिकांच्या कापणीनंतर भंडारण क्षमतेमध्ये वृद्धी, सिंचनाच्या सुविधांमध्ये सुधारणा आणि निवडण्यात आलेल्या १०० जिल्ह्यांमधील शेतकरी वर्गाला दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्जांची उपलब्धता सहजतेने व्हावी, हे सुनिश्चित करणे.

### पीएम किसान सन्मान निधी

**४.०९ लाख कोटी रुपयापेक्षाही जास्त निधी 'डीबीटी'च्या माध्यमातून शेतकरी बांधवांना २१ हप्त्यांमध्ये देण्यात आला आहे.**

● ९.३४ कोटींपेक्षा जास्त लाभार्थींना पीएम किसान योजनेचा लाभ मिळाला आहे. ज्यांचे ई-केवायसी पूर्ण आहे, त्यांना हा लाभ मिळाला आहे. सध्या देशातील ४२.८ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी होणे बाकी आहे.

● पीएम किसान अंतर्गत कृषी योग्य भूमी असलेल्या शेतकरी बांधवांसाठी एक उत्पन्न सहाय्यक योजना आहे. याअंतर्गत तीन समान हप्त्यांमध्ये दरवर्षी ६,००० रूपये दिले जातात.

**आंतरराष्ट्रीय खाद्यान्न धोरण संशोधन संस्थेच्या शोधातून, आलेल्या निष्कर्षातून असे दिसूत येते की, पीएम किसान सन्मान योजनेने शेतकरी बांधवांची कर्जासंबंधीच्या अडचणी कमी झाल्या आहेत. शेतकऱ्यांची जोखीम घेण्याच्या क्षमतेमध्ये आता सुधारणा झाली आहे. कृषीसाठी आवश्यकते बरोबरच अतिरिक्त मिळणाऱ्या**

निधीचा उपयोग शिक्षण, औषधोपचार आणि विवाह यांसारख्या इतर खर्चाची पूर्तता करण्यासाठीही केला गेला आहे.

नीती आयोगाने केलेल्या अभ्यास पाहणीतून असे दिसून आले आहे की, ८५ टक्के लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे. पिकांवर रोग पडून ती खराब होणे, अथवा आपद्काळात औषधोपचार करावा लागणे यासाठी खाजगी कर्जावर त्यांना अवलंबून रहावे लागत होते, हे प्रमाण पीएम किसान सन्मान योजनेमुळे कमी झाले आहे.

# धान्याला योग्य बाजारपेठ आणि शेतकऱ्याला योग्य मोबदला

## पीएम कृषी उडान योजना



गुवाहाटीमधील 'राजा मिरची, बर्मी द्राक्षे आणि असामी लिंबू, त्रिपुरातील फणस आणि बिहारमधील विविध जिल्ह्यातून लिची आता देशामध्ये सर्वत्र आणि परदेशातही सहजपणे पोहोचत आहे. हे केवळ कृषी उडान योजनेमुळे शक्य झाले आहे. या योजनेला २०२१ मध्ये प्रारंभ झाला.

- ३५ विमानतळांवर शीतगृहांची सुविधा उपलब्ध आहे. योजनेमध्ये ५८ विमानतळांचा समावेश आहे. ही योजना प्रामुख्याने ईशान्येकडील राज्ये, डोंगराळ प्रदेश आणि आदिवासी क्षेत्रातील २ विमानतळांसाठी केंद्रीत आहे.

## कृषी निर्यात

- सरकार कृषी आणि संबंधित वस्तूंची निर्यात तसेच वैश्विक व्यापारामध्ये आपली भागीदारी वाढविण्याच्या दिशेने काम करीत आहे.
- वर्ष २०२४-२५ मध्ये कृषी आणि संबंधित वस्तूंची विक्रमी. ५१.९ अब्ज अमेरिकी डॉलरची निर्यात करण्यात आली.





शेतकरी बांधवांना आपल्या कृषी मालाला चांगला भाव मिळावा, यासाठी इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) चा शुभारंभ केला. ४.४० लाख कोटी रूपयांपेक्षा अधिक कृषी मालाच्या विक्री-खरेदीचे व्यवहार ई-नामच्या माध्यमातून केले गेले.

- १.७९ कोटींपेक्षा जास्त शेतकरी, ३.९० लाख व्यापारी आणि दलाल प्रतिनिधी यांच्या शिवाय ४,६४२ कृषी उत्पादक संघटना या ई-नाम मंचावर नोंदणी केलेले आहेत. २७ राज्यांतील १,५२२ मंडया ई-नामबरोबर जोडल्या गेल्या आहेत. ही आकडेवारी ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतची आहे.

## 'एमएसपी'मध्ये वाढ

- सरकारने वर्ष २०१८-१९ पासून अखिल भारतीय भारीत सरासरी उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के लाभासह उत्पन्न शेतकरी बांधवांना मिळावे, यासंदर्भात आदेश काढला आहे. या सूचीमध्ये ज्या पिकांचा समावेश आहे, त्यांच्या दगाविषयी सरकारने अधिसूचना जारी केली आहे. त्या सूचीनुसार खरीप, रबी आणि इतर व्यावसायिक पिकांसाठी एमएसपीमध्ये वाढ केली आहे. गेल्या एक दशकाच्या कालावधीमध्ये सरकारी अन्नधान्य खरेदी ७६१.४० लाख मेट्रिक टनांवरून वाढ करून ती १,१७५ लाख मेट्रिक टन झाले आहे.




एमएसपीअंतर्गत शेतकरी बांधवांना खर्चाच्या जवळपास तिप्पट दरवाढ मिळाली

| २०१३-१४ | (जुलै) २०२४- (जून) २०२५ |
|---|---|
| १.०६ | ३.३३ |

(आकडे करोडो रुपयांमध्ये आहेत.)

# कृषी पायाभूत सुविधा होत आहेत मजबूत



## कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड

- १ लाख कोटी रूपये इतका कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड कृषी पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी सुरू करण्यात आला. या योजनेअंतर्गत ३% व्याजदराने २ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाते. यात पतहमी छत्रदेखील दिले जाते.
- ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १,३४,३७२ प्रकल्पांसाठी ७५,१४० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे कृषी क्षेत्रात १.२० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित होईल.

## कृषी विज्ञान केंद्रांचे विस्तारले जाळे

- भारतीय कृषी संशोधन परिषदेद्वारे चालवले जाणारे हे केंद्र शेतकरी प्रशिक्षणात आघाडीवर आहेत.
- २०२१-२२ ते २०२३-२४ दरम्यान, कृषी केंद्रांनी ५८.०२ लाख शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले तर २०२४-२५ मध्येही १९ लाखांहून अधिक शेतकरी झाले प्रशिक्षित.
- कृषी विज्ञान केंद्रांमधील अभ्यासक्रमांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार तयार केलेले प्रगत कृषी विज्ञान, पशुधन देखभाल, मृद आरोग्य, काढणीनंतरचे तंत्रज्ञान इत्यादींचा समावेश आहे.

## जगातील सर्वात मोठी धान्य साठवण योजना

- केंद्रीय मंत्रिमंडळाने ३१ मे २०२३ रोजी सहकारी क्षेत्रासाठी जगातील सर्वात मोठी धान्य साठवण योजना संमत केली. पायलट प्रकल्पांतर्गत ११ राज्यांमध्ये ११ पॅक्समध्ये गोदामांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.



**५०० हून अधिक पॅक्सची निवड या योजनेसाठी करण्यात आली आहे. १०८ चे बांधकाम सुरू झाले असून त्यापैकी २४ पूर्ण झाली आहेत. डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व बांधकाम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.**

## एआय - आधारित अंदाज

**३.८ कोटी शेतकऱ्यांना या अनोख्या उपक्रमाचा भाग म्हणून गेल्या वर्षी एम-किसान पोर्टलद्वारे पाच प्रादेशिक भाषांमध्ये एआय-आधारित मान्सूनचा अंदाज पाठवण्यात आला.**

# शेतकऱ्यांच्या जीवनाला मिळाले सुरक्षा कवच



## किसान क्रेडिट कार्ड

● किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) चा विस्तार २०१९ मध्ये पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालनासाठीही करण्यात आला. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात कर्ज मर्यादा ३ लाखांवरून ५ लाख करण्यात आली आहे.

● ७.७ कोटींहून अधिक शेतकरी, मच्छिमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळत आहे.

● १० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीची कर्जे आणि १.६२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त व्याज अनुदान किसान क्रेडिट कार्ड लाभार्थ्यांना २०२४-२५ मध्ये देण्यात आले आहे.

## शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ)

● १० हजारहून अधिक एफपीओने भारतभरातील शेतकाऱ्यांना सक्षम बनवले आहे. ऑक्टोबर २०२५ पर्यंत देशभरातील ५२ लाख शेतकरी एफपीओशी संलग्न झाले आहेत.

● १,१०० एफपीओ करोडपती झाले आहेत, ज्यांची उलाढाल १५,००० कोटींपेक्षा जास्त आहे. २०२७-२८ या आर्थिक वर्षासाठी ६,८०० कोटी रुपये निधीचे वाटप करण्यात आले आहे.

## श्रीअन्न अर्थात भरड धान्याचे विपणन आणि विकास

● २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. मे २०२५ पर्यंत मंत्रिमंडळाने २०२५-२६ च्या विपणन हंगामासाठी नाचणीसाठी किमान आधारभूत किंमत मंजूर केली, जी प्रति क्विंटल ५९६ इतकी दुसरी ससर्वोच्च वाढ आहे.

● १८०.१५ लाख टन भरड धान्यांचे उत्पादन आणि ८९ हजार टनांपेक्षा जास्त निर्यात भारताने २०२४-२५ मध्ये केली. उत्पादनात राजस्थान आघाडीवर राहिला, त्यानंतर महाराष्ट्र आणि कर्नाटकचा क्रमांक होता.

## पंतप्रधान मानधन

● पंतप्रधान किसान मानधन योजना ही १८ ते ४० वर्षे वयोगटासाठी एक ऐच्छिक आणि अंशत: पेन्शन योजना आहे. यात ६० वर्षे पूर्ण झाल्यावर किमान मासिक सुनिश्चित निवृत्तीवेतन ३,००० निश्चित करण्यात आले आहे.

● २४.८८ लाख नामांकने या योजनेअंतर्गत जुलै, २०२५ पर्यंत करण्यात आली आहेत.

# पारंपरिक आणि नैसर्गिक शेतीवर अधिक भर



## राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान

● हे अभियान २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सुरू झाले. १५,००० गटांद्वारे ७.५ लाख हेक्टर जमिनीवर नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. याचा फायदा १ कोटी शेतकऱ्यांना होईल.

● १४.३ लाखहून अधिक शेतकरी ऑगस्ट २०२५ पर्यंत राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाशी जोडले गेले आहेत.

● ५.४५ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर नैसर्गिक शेती केली जात आहे. प्रत्येक शेतकऱ्याला दोन वर्षासाठी प्रति एकर ४००० रुपये (प्रति शेतकरी एक एकर) प्रोत्साहनपर रक्कम मिळते.

## ईशान्य प्रदेशासाठी सेंद्रिय मूल्य साखळी विकास अभियान

● २०१५-१६ मध्ये सुरू झालेल्या या अभियानाचे उद्दिष्ट सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये सेंद्रिय उत्पादन समूह स्थापन करणे हे आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी तीन वर्षात प्रति हेक्टर ४६,५०० रुपये दिले जातात. २०२४-२५ मध्ये २.६९ लाख शेतकऱ्यांना याचा फायदा झाला.

## परंपरागत कृषि विकास अभियान

● परंपरागत कृषी विकास योजना (पीकेव्हीवाय) ही देशातील सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणारी पहिली मोठी योजना आहे. ती २०१५-१६ मध्ये सुरू करण्यात आली.

● २८.३४ लाख शेतकऱ्यांना योजनेच्या सुरूवातीपासून ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत फायदा झाला. या योजनेअंतर्गत १६.९० लाख हेक्टर क्षेत्र व्यापण्यात आले. आणि ५८,१५५ समूह सेंद्रिय शेतीसाठी तयार करण्यात आले.

## राष्ट्रीय बांबू अभियान



● राष्ट्रीय बांबू अभियान २३ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात (जम्मू आणि काश्मीर) बांबू लागवड, प्रक्रिया आणि विपणनाला प्रोत्साहन देते.

● भारतात बाबूंखालील सर्वाधिक क्षेत्र (१३.९६ दशलक्ष हेक्टर) आहे. बांबू विविधतेत चीननंतर हा दुसरा सर्वात श्रीमंत देश आहे. भारतातील बांबू आणि वेत उद्योग २८,००६ कोटी रुपयांचा आहे.

# पीक संरक्षणातून समृद्धीच्या मार्गावर



## पंतप्रधान पीक विमा योजना



● या योजनेची सुरुवात १८ फेब्रुवारी २०१६ रोजी करण्यात आली. वन्य प्राण्यांमुळे होणारे पीक नुकसान आणि भात पिकांमध्ये पाणी साचणे या दोन्ही गोष्टी आता पीएमएफबीवायमध्ये समाविष्ट आणि २०२६ च्या खरीप हंगामापासून ती देशभरात लागू केली जाईल.

● ९२.९२ कोटी शेतकरी अर्जदारांच्या ५५.४८ कोटी हेल्टर पिकांचा विमा योजनेच्या सुरुवातीपासून ८ जानेवारी २०२६ पर्यंत उतरवण्यात आला होता. अर्जदारांपैकी ५०% पेक्षा जास्त अर्जदार हे ओबीसी, एससी आणि एसटी शेतकरी आहेत.

● १,९१,६२० कोटी रुपये दाव्यापोटी शेतकऱ्यांना मिळाले. शेतकऱ्यांनी ३९,४४६ कोटी रुपयांचा हप्ता भरला होता.

## खते

● सरकार शेतकऱ्यांना १,६३३ रुपयांची युरियाची पिशवी २६६ रुपयांना आणि ३,३०० रुपयांची डीएपीची ५० किलोची पिशवी १,३५० रुपयांना उपलब्ध करून देते. उर्वरित रकमेचा भार अनुदानाच्या स्वरूपात सरकार स्वीकारते.

● १४.६ लाख कोटी रुपये सरकारने अनुदानावर खर्च केले.

● ५२५ लाख टनाच्या जवळपास युरियाचे उत्पादन २०२५ मध्ये झाले.

## मृदा आरोग्य

● सरकार मृदा आरोग्य आणि खत योजनेद्वारे खतांचा विवेकी वापर करण्यास प्रोत्साहन देते. दर तीन वर्षांनी किमान एकदा शेतासाठी मृदा आरोग्य कार्ड दिले जाते.

● २५.६१ कोटी मृदा आरोग्य कार्ड योजनेच्या २०१४-१५ मधील सुरुवातीपासून ९ डिसेंबर २०२५ पर्यंत वितरीत करण्यात आली. ४० आकांक्षी जिल्ह्यांमधील २९० लाख हेक्टर जमिनीवर मृदा मॅपिंग पूर्ण झाले आहे.

## पीक विविधकरण कार्यक्रम



● या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना पाण्याची जास्त गरज असलेल्या भातासारख्या पिकांपासून डाळी, तेलबिया आणि भरड धान्य यासारख्या पर्यायी पिकांकडे वळण्यास प्रोत्साहित करणे हा आहे.

● २५ पिकांच्या १८४ नवीन जाती भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या शास्त्रज्ञांनी विविध कृषी–हवामान परिस्थिती, मातीचे प्रकार आणि शेती पद्धती लक्षात घेऊन विकसित केल्या आहेत, ज्यामुळे पीक विविधीकरणाला गती मिळेल.

# पाणी पोहोचले शेताला, भार कमी झाला खिशाला



## पंतप्रधान कृषी सिंचन योजना

● ९६.९७ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्राला पंतप्रधान कृषी सिंचन योजनेअंतर्गत प्रति थेंब अधिक पीक उपक्रमाचा फायदा झाला. प्रति थेंब अधिक पीक योजना २०१५–१६ पासून लागू आहे. ही योजना ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यासारख्या सुक्ष्म सिंचन तंत्रांद्वारे शेती पातळीवर पाण्याचा दक्षतेने वापर करण्यास प्रोत्साहन देते.

● ६३ प्रमुख सिंचन प्रकल्पांना मंजुरी, सुधारित सिंचन सुविधांसह २ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सक्षम बनविले गेले.

● केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२५–२०२६ या वर्षासाठी पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या उप–योजना म्हणून कमांड परिसर विकास आणि जल व्यवस्थापन आधुनिकीकरणाला मान्यता दिली.

## पीएम कुसुम योजना

● मार्च २०१९ मध्ये सुरू झालेली पीएम कुसुम योजना जानेवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली.

● ३४,८०० मेगावॅट सौरऊर्जा क्षमता वाढविण्याचे या योजनेचे उद्दिष्ट, ३४.४२२ कोटी रुपयांची केंद्रीय आर्थिक मदत मार्च २०२६ पर्यंत दिली जाईल.

## जीएसटी सुधारणांतून कृषीला मिळाले लाभ



● कृषी क्षेत्रातील जीएसटीमधील बदल हे शेतकरी–अनुकूल, ग्रामीण कल्याण आणि स्थैर्याच्या दिशेने एक पाऊल आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल. तसेच सहकारी संस्था आणि शेतकरी उत्पादक संघटनांनाही यांचा लाभ मिळेल.

● १,८०० सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या ट्रॅक्टरवरील १२% जीएसटी तर ट्रॅक्टरच्या घटकांवरील जीएसटी देखील १८% वरून ५% पर्यंत कमी करण्यात आला आहे.

● १८% करण्यात आला व्यावसायिक मालवाहनांवरील जीएसटी २८% वरून कमी करून ५% करण्यात आला. तयार आणि प्रक्रियायुक्त भाज्या, फळे आणि बियांवरील जीएसटी १२% वरून कमी करून निर्यातीला चालना मिळेल, कृषी निर्यात केंद्र म्हणून भारताचे स्थान मजबूत होईल.

● ५% करण्यात आला अमोनिया, सल्फ्यूरिक आम्ल आणि नायट्रिक आम्ल यांसारख्या खतांवरील जीएसटी १८% वरून कमी करून, यामुळे खत उत्पादन खर्च कमी होईल आणि परवडणाऱ्या दरात खतांची उपलब्धता सुनिश्चित होईल.

# पशुपालन, मत्स्यपालन आणि फलोत्पादनातही सरकारी साथ



## पंतप्रधान मत्स्य संपदा योजना

● १० सप्टेंबर २०२० रोजी सुरू झालेल्या पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेने मच्छिमारांना विक्रमी उत्पादन, निर्यात वाढ आणि समावेशक आणि शाश्वत विकासासह सक्षम बनवण्यात आले. भारत आता जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मत्स्य उत्पादक देश बनला आहे.

● ५८ लाख उपजीविका निर्माण आणि ९९,०१८ महिलांचे या योजनेमुळे झाले आहे सक्षमीकरण.

● ११ वर्षामध्ये दुप्पटीहून अधिक झाले मत्स्य उत्पादन २०१३-१४ ९६ लाख टन, २०२४-२५ लाख टन.

## गोकुळ मिशन

● विश्व जगातील १४% गायी आणि ५७% म्हशींसह जनावरांच्या लोकसंख्येत भारत पहिल्या क्रमांकावर आहे. १६ डिसेंबर २०१४ रोजी देशी गोधनाचा म्हणजेच बोव्हाईल जातीचा विकास आणि संवर्धन, दूध उत्पादन आणि उत्पादकता वाढवणे या उद्देशाने राष्ट्रीय गोकुळ अभियान सुरू करण्यात आले.

● १.२८ कोटी सेक्स सॉर्टेड सीमेन मात्रा उत्पादन, स्वदेशी तंत्रज्ञानाद्वारे मात्रा उत्पादनाचा खर्च ८०० रुपयांवरून २५० रुपये प्रति मात्रेपर्यंत कमी करण्यात आला.

● १४.५६ कोटी जनावरांचे गर्भाधान मिशनच्या कृत्रिम गर्भाधान कार्यक्रमात करण्यात आले. १९.३६ कोटी जनावरे योजनेत सहभागी. १५६२ कोटींहून अधिक शेतकरी याचे लाभार्थी.

## कृषी वनीकरण



● पीक आणि पीक पद्धतींबरोबरच शेतावरील वृक्षारोपणाला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत कृषी वनीकरण उप-मिशन (एसएमएएफ) कार्यान्वित करण्यात आले.

● ३.९३ कोटी हेक्टर कृषी वनीकरण क्षेत्र भारतात आहे. भारत आणि इंडोनेशियाचे एकूण कृषी वनीकरण क्षेत्र आशियातील कृषी वनीकरण क्षेत्रापैकी जवळपास १००% आहे. याचे जागतिक स्तरावरील प्रमाण सुमारे ७०% भरते.

## राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियान



● 'गोड क्रांती'चे ध्येय साध्य करण्यासाठी आत्मनिर्भर भारत अभियानाचा एक भाग म्हणून राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियान सुरू करण्यात आले.

● जुलै २०२५ मध्ये भारत चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मध निर्यातदार देश बनला, जो २०२० मध्ये नवव्या क्रमांकावर होता.

● १.०७ लाख मेट्रिक टन नैसर्गिक मधाचे उत्पादन २०२३-२४ मध्ये भारतात झाले.

# शेती आणि शेतकऱ्यांना मिळाली तंत्रज्ञानाची साथ

**केंद्र सरकारने डिजीटल अभियान सुरू केले आहे. यामध्ये डिजीटल कृषी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. यामध्ये ॲग्रीस्टॅक, कृषी निर्णय समर्थन प्रणाली, मातीची व्यापक सुपीकता आणि प्रोफाइल नकाशे तसेच आयटी उपक्रम यांचा समावेश आहे.**





**१५,००० ड्रोनच्या खरेदी योजनेला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे, ज्यापैकी १,०९४ ड्रोन वितरीत करण्यात आले आहेत आणि ड्रोन दीदींना प्रशिक्षण देखील देण्यात आले आहे.**

**७५% रकमेचे अनुदान शेतकरी उत्पादक संघटनांना शेतकरी ड्रोन खरेदीवर दिले जाते. शेतकऱ्यांना भाड्याने ड्रोन उपलब्ध करून देणाऱ्या सहकारी संस्था, एफपीओ आणि ग्रामीण उद्योजकांना देखील ड्रोनच्या खरेदीवर ४०% दराने कमाल ४ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते.**

● ७.६८ कोटी किसान आयडी ४ डिसेंबर २०२५ पर्यंत १४ राज्यांमध्ये तयार करण्यात आले आहेत. या राज्यांमध्ये पीएम किसान योजनेअंतर्गत नोंदणीसाठी किसान आयडी अनिवार्य करण्यात आले आहेत.

● २,०९६ कृषी स्टार्ट अप्सना २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीत नवोन्मेष आणि कृषी उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत सरकारने तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य प्रदान केले आहे.

● २.७६ कोटी मालमत्ता कार्ड १.८२ लाख गावांमध्ये स्वामित्व योजनेअंतर्गत तयार करण्यात आली आहेत. ३.२८ लाख गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. मार्च २०२६ पर्यंत ३.४४ लाख गावांपर्यंत पोहचण्याचे उद्दिष्ट आहे.

● **कृषी यांत्रिकीकरण :** देशात विविध पीके आणि त्यांच्या कृषी व्यवस्थापनात कृषी यांत्रिकीकरणाची सरासरी पातळी वेगवेगळी आहे. बियाणे पेरण्याची जागा तयार करण्यासाठी ७०%, पेरणी आणि लागवडीसाठी ४०%, तण काढण्यासाठी ३३% आणि कापणी आणि मळणीसाठी ३४% आहे. परिणामी एकूण सरासरी यांत्रिकीकरण ४५% आहे.

# तेल आणि डाळींमध्ये स्वयंपूर्णतेच्या दिशेने उचलली पावले




### राष्ट्रीय खाद्यतेल अभियान, पाम तेल अभियान

**२०२१ मध्ये या अभियानाला मंजुरी देण्यात आली, ११,०४० कोटी रुपये वित्तीय खर्च निर्धारित करण्यात आला.**

- ६.५ लाख हेक्टर क्षेत्र २०२५-२६ पाम तेल लागवडीखाली आणण्याचे लक्ष्य, कच्च्या पाम तेलाचे (सीपीओ) उत्पादन २०२९-३० पर्यंत २८ लाख टनांपर्यंत पोहोचवण्याचे लक्ष्य.
- १.८९ लाख हेक्टर क्षेत्र या अभियानांतर्गत मार्च २०२५ पर्यंत व्यापण्यात आले. देशात पाम तेलाची लागवड ५.५६ लाख हेक्टरपर्यंत पोहोचली.
- मागील दशकात कच्च्या पाम तेलाचे उत्पादन दुप्पट झाले आहे. २०१४-१५ १.९१ लाख टन, २०२५-२६ ३.८० लाख टन.

### राष्ट्रीय खाद्य तेल अभियान -तेलबिया



- खाद्य तेल उत्पादनात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय खाद्य तेल अभियान - तेलबियाला २०२४ मध्ये मंजुरी देण्यात आली.
- या अभियानाचे उद्दिष्ट २०३०-३१ पर्यंत २९ दशलक्ष हेक्टर (२०२२-२३) वरून वाढवून ३३ दशलक्ष हेक्टरपर्यंत पोहचवण्याचे आहे.
- या अभियानाचे उद्दिष्ट खाद्य तेल उत्पादन २०३०-३१ पर्यंत २५.४५ दशलक्ष टनपर्यंत पोहचवण्याचे आहे. जे आपल्या अंदाजे देशांतर्गत गरजेच्या सुमारे ७२ टक्के गरज पूर्ण करेल.

## डाळींमध्ये स्वयंपूर्णता अभियान

- पंतप्रधानांनी ११ ऑक्टोबर २०२५ रोजी ११,४४० कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीसह डाळींमधील स्वयंपूर्णता अभियान (२०२५-२६ ते २०३०-३१) सुरू केले.
- शेतकऱ्यांना एकूण ८८ लाख मोफत बियाणे किट आणि १२६ लाख क्विंटल प्रमाणित बियाणे वाटप केले जाईल.



अंदाजे दोन कोटी शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.

- ३५० लाख टनपर्यंत डाळींचे उत्पादन आणि लागवडीचे क्षेत्र ३१० लाख हेक्टर क्षेत्र २०३०-३१ पर्यंत वाढवण्याचे लक्ष्य. योजनेत ४ वर्षांपर्यंत एमएसपी दराने तूर, उडीद आणि मसूरची १००% खरेदी सुनिश्चित करणे आहे. ■

# हडपसर-यवत मार्गावर सहापदरी उड्डाणपूल



## पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी १ लाख १० हजार कोटींचे प्रकल्प

> पुणे परिसरात अनेक वर्षांपासून केवळ चर्चेत असलेल्या महामार्ग विस्तार गती मिळाली आहे. पुणे शहराला वाहतूक कोंडी आणि प्रदूषणातून मुक्त करण्यासाठी केंद्रीय वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी महत्त्वाचा कृती आराखडा जाहीर केला.

### एक लाख १० हजार कोटींच्या प्रकल्पांची घोषणा

पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे एक लाख १० हजार कोटी रुपयांच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांची घोषणा त्यांनी केली असून, त्यापैकी सुमारे ४५ हजार कोटी रुपयांच्या चार प्रमुख प्रकल्पांचे भूमिपूजन येत्या महिन्यात करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामध्ये पुणे ते शिरूर, हडपसर-यवत, नाशिक फाटा ते खेड; तसेच तळेगाव-चाकण-शिक्रापूर या उन्नत मार्गांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे पुणे शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### प्रकल्पांचा आढावा

पुणे शहर व परिसरातील विविध प्रकल्पांचा श्री. गडकरी यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर आढावा घेतला. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय), महामेट्रो, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ (एमएसआयडीसी) आणि महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

### कोंडीची समस्या गंभीर

गडकरी म्हणाले, 'पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. प्रदूषणामध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यासाठी ४५ हजार कोटींचे प्रकल्प राज्य सरकारला सादर केले होते. त्यासाठी वस्तू सेवा करात सूट, आवश्यक ठिकाणी भूसंपादन, रॉयल्टीमध्ये सवलत अशा सुविधांची मागणी केली होती. त्यानुसार आता चार प्रकल्पांचे काम महिनाभरात सुरू केले जाणार आहे.



त्याच्या उद्धाटनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या वेळा घेण्यास सांगितले आहे. या चारही प्रकल्पांचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ(एमएसआयडीसी) यांच्या मार्फत केले जाणार आहे. त्यांच्या कामावर 'एनएचएआय'मार्फत देखरेख ठेवली जाईल. दरम्यान, नितीन गडकरी यांनी आगामी महिनाभरात या प्रकल्पांच्या कामास सुरुवात होईल, असे सांगितल्याने पुढील काळात जिल्ह्यातील वाहतूक कोंडी काहीशी कमी होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

## महिनाभरात भूमिपूजन केल्या जाणाऱ्या प्रकल्पांची माहिती

**पुणे ते शिरूर**

- पुणे ते शिरूर ५३ किलोमीटर उन्नत मार्ग.
- प्रकल्पाचा एकूण खर्च सात हजार ५१५ कोटी रुपये तीन मजली उन्नत मार्ग.
- जमिनीवर चार लेन, उड्डाणपुलावर सहा लेन आणि वरती मेट्रो मार्ग.
- खराडी ते विठ्ठलवाडी १७ किलोमीटर मेट्रोचा समावेश.

**हडपसर-यवत**

- हडपसर ते यवत या ३१.५ किलोमीटर लांबीच्या उन्नत मार्गाची उभारणी.
- या प्रकल्पासाठी सुमारे ५,५८६ कोटी रुपयांची गुंतवणूक.
- सहा लेनचा उड्डाणपूल.
- मार्गावर सर्वात वरती मेट्रो मार्गासाठी नियोजन.

**नाशिक फाटा ते खेड**

- या प्रकल्पाची अंदाजित किंमत ७,८०८ कोटी रु.
- 'थ्री-लेयर' स्ट्रक्चरचा वापर करण्याचा विचार.
- मेट्रोसाठी आताच तरतूद केली जाणार.
- मार्गासाठी ९० टक्के भूसंपादन.

## पालखी मार्गाचे काम अंतिम टप्प्यात

आळंदी ते पंढरपूर या महत्त्वाच्या पालखी मार्गाचे काम पूर्ण होत आले आहे. दिवे घाट येथील काम ५० टक्क्यांच्या पुढे झाले आहे. या प्रकल्पाची महिन्यात स्वतः फिरून पाहणी करणार आहे. या पाहणी दौऱ्यानंतर लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पालखी मार्गांचे लोकार्पण करण्याचे नियोजन आहे. साधारण मे अखेरपर्यंत या मार्गाचे काम होणे अपेक्षित आहे, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

**तळेगाव-चाकण-शिक्रापूर**

- तळेगाव-चाकण-शिक्रापूर ५४ किलोमीटर उन्नत मार्ग.
- प्रकल्पासाठी एकूण चार हजार कोटींचा खर्च.
- चार लेनचा उन्नत मार्ग.
- औद्योगिकदृष्ट्या परिसरातील वाहतूक सुलभ करण्यासाठी प्रकल्प उपयुक्त.

## शिरूर ते छत्रपती संभाजीनगर नवीन एक्स्प्रेस-वे

पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा मार्ग दोन टप्प्यांत केला जाणार आहे. त्यापैकी पुणे ते शिरूर हा उन्नत मार्ग असून, त्याचे महिन्याभरात भूमिपूजन केले जाणार आहे. त्यानंतर शिरूर ते छत्रपती संभाजीनगर हा पूर्णपणे नवीन ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस-वे बांधला जाईल. या मार्गाची लांबी १९२.५० किलोमीटर असून, यासाठी १५,००० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा मार्ग पूर्णपणे 'ॲक्सेस कंट्रोल' स्वरूपाचा असेल. त्यामुळे पुणे ते संभाजीनगर हे अंतर केवळ दोन तास १५ मिनिटांत पार करणे शक्य होईल. हा महामार्ग पुढे समृद्धी महामार्गाला जोडला जाणार असल्याने पुणे ते नागपूर हा प्रवास केवळ पाच तासांत पूर्ण होऊ शकेल; तसेच सध्या असलेल्या महामार्गाचेही काम केले जाणार असून, त्यासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचे गडकरी यांनी सांगितले. ■


# पुणे-मुंबईदरम्यान कनेक्टिव्हिटी वाढणार

**जुना महामार्गही होणार सहापदरी, नवीन 'एक्स्प्रेस वे'चे लवकरच भूमिपूजन**

पुणे-मुंबई दरम्यान प्रस्तावित असलेल्या तिसऱ्या महामार्गाचे अर्थात, नवीन 'एक्स्प्रेस वे'ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, येत्या महिन्याभरात त्याचे भूमिपूजन होऊन कामही सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात पागोटे (अटल सेतू) ते चौकपर्यंतच्या (कर्जत) टप्प्याचे काम केले जाणार आहे. या नवीन 'एक्स्प्रेस वे'ची पूर्णपणे नव्याने आखणी केली जाणार असून, पुण्यामध्ये हा रस्ता खेड-शिवापूर येथे रिंग रोडला जोडला जाणार आहे.

**केंद्रीय** रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गेल्या वर्षी 'मुंबई–बेंगळुरू एक्स्प्रेस वे'ची घोषणा केली होती. या रस्त्याचे काम प्राधान्याने करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर पावले उचलण्यात आली होती. त्यातूनच पागोटे ते चौक या टप्प्याचे काम हाती घेतले जाणार आहे. चौक (कर्जत) ते शिवरे (खेड–शिवापूर) या अंतरासाठीच्या सविस्तर प्रकल्प आराखड्याला मान्यता मिळाली आहे. त्याची निविदा प्रक्रियाही पूर्ण झाली आहे तसेच येथील भूसंपादनाचा विषयही बहुतांशी मार्गी लागलेला आहे. सध्या हा रस्ता आठपदरी केला जाणार आहे. मात्र, भविष्यात सोळा मार्गिकांपर्यंत विस्तार करण्याची क्षमता ठेवण्यासाठी १०० मीटर जागा संपादित केली जाणार आहे. नवीन 'एक्स्प्रेस वे'साठी लोणावळा ते खोपोली यादरम्यान पूर्णपणे नवीनच रस्ता केला जाणार आहे. यामध्ये बोगदे आणि उड्डाणपूल याचा समावेश असेल. मिसिंग लिंक आणि जुन्या महामार्गाबरोबरच घाट क्षेत्रात हा तिसरा नवीन रस्ता उपलब्ध होणार आहे. जुन्या महामार्गावर लोणावळा, खोपोली आणि खालापूर या ठिकाणी बाह्यवळण मार्ग (बायपास) प्रस्तावित करण्यात आले आहेत. 'नवीन एक्स्प्रेस वे लोणावळ्याहून पवना खोऱ्यातून मुळशीमार्गे खेड–शिवापूर येथील शिवरे गावात रिंग रोडला जोडण्यात येणार आहे. या मार्गाचा डीपीआर तयार करण्यात येत आहे,' अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुणे विभागाचे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी दिली. ■

## जुन्या महामार्गासाठी 'डीपीआर': नितीन गडकरी



**पुणे–मुंबई जुन्या महामार्गासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाने सविस्तर प्रकल्प आराखडा तयार केला असून, मान्यतेसाठी तो केंद्रीय मंत्रालयाकडे पाठवण्याची सूचना नितीन गडकरी यांनी केली आहे. या रस्त्यावर २०३०पर्यंत 'आयआरबी' कडून टोल वसुली केली जाणार आहे. त्यामुळे या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम 'एमएसआरडीसी'कडून करायचे की महामार्ग प्राधिकरण करणार, याबाबत कालांतराने निर्णय घेऊ, असे गडकरी यांनी स्पष्ट केले.**

# धारावीखालून वांद्रे टर्मिनसपर्यंत भुयारी मार्ग

## मुंबई मेट्रो-११ वर पाच नवी स्थानके होणार



**मुंबईतील** मेट्रो जाळे अधिक व्यापक करण्यासाठी राज्य सरकारने मेट्रो मार्गिका ११मध्ये काही महत्त्वाचे बदल जाहीर केले. २०२५ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या प्रस्तावित मार्गिकेचा आता विस्तार करण्यात येणार असून, त्यामध्ये पाच नव्या स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या बदलामुळे मुंबईतील पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण भागांना अधिक प्रभावी जोडणी मिळणार आहे.

मेट्रो मार्गिका १५ ही पूर्णपणे भुयारी असणार आहे. ही मार्गिका वडाळा येथून सुरू होऊन दक्षिण मुंबईपर्यंत जाणार असून, ती मेट्रो लाइन ४ (वडाळा ते कासारवडवली) ला जोडली जाणार आहे.

वडाळा स्थानकापासून या मार्गिकेचा विस्तार करण्यात येणार असून, त्यामुळे ठाणे आणि पूर्व मुंबईतील प्रवाशांना दक्षिण मुंबईत पोहोचणे अधिक सोपे होणार आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे २३ हजार ४८७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

### मुंबई मेट्रो-११ वर पाच नवी स्थानके होणार

सुरुवातीला मेट्रो-११ मार्गिका १७.५ किलोमीटर लांबीची प्रस्तावित होती. मात्र, आता या मार्गिकेत ६.९ किलोमीटरची भर पडणार आहे. त्यामुळे एकूण मार्गिका सुमारे २४.४ किलोमीटरपर्यंत वाढणार आहे. तसेच या मार्गिकेवरील स्थानकांची संख्याही वाढवण्यात आली आहे. सुरुवातीला १४ स्थानकांचा प्रस्ताव होता, मात्र आता त्यामध्ये पाच नवीन स्थानकांचा समावेश करण्यात आला असून, एकूण स्थानके १९ होणार आहेत. नवीन प्रस्तावानुसार चुनाभट्टी, शीव, मध्य धारावी, वांद्रे पश्चिम आणि वांद्रे टर्मिनस ही पाच नवी स्थानके उभारण्यात येणार आहेत. यापूर्वी या मार्गिकेवर अनिक बस डेपो, सीजीएस बस कॉलनी, गणेश नगर, बीपीटी रुग्णालय, शिवडी, हे बंदर, बंदर कोल, रे रोड, भायखळा, नागपाडा जंक्शन, भेंडी बाजार, क्रॉफर्ड मार्केट, सीएसएमटी, हॉर्निमन सर्कल आणि एसपीएम सर्कल ही १४ स्थानके प्रस्तावित होती. ■

# राज्यातील नदीजोड प्रकल्प दृष्टिपथात



**राज्यात** गेल्या अनेक वर्षांपासून दाखवण्यात येत असलेले नदीजोड प्रकल्पाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी राज्य सरकारने वेगाने हालचाली सुरू केल्या आहेत. नदीजोड प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात एक लाख १५ हजार ५३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील अनेक भागांत पाण्याची मुबलकता वाढणार आहे.

राज्यात आगामी २० वर्षांसाठी पाण्याची तरतूद करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरू केले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागांत पाणी उपलब्धा सुनिश्चित करण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेसाठी ९४ हजार ९६८ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. वैतरणा आणि उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याचे प्रस्तावित आहे. तर, दमणगंगा-वैतरणा गोदावरी नदीजोड प्रकल्पाच्या १३ हजार ४९७ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या ७ हजार ४६५ कोटी रुपये किंमतीच्या कामास मान्यता देण्यात आली आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प भंडारा जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा नदीचे पाणी बुलढाणा जिल्ह्यातील पूर्णा-नळगंगा नदीत आणले जाणार आहे. या प्रकल्पासाठी विदर्भातील अनेक जिल्ह्यांतून ३८८.२८ कि.मी. लांबीचा कालवा तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पात एकूण २०.४९ किमीच्या १३ बोगद्यांचा समावेश आहे. विदर्भातील एकूण ८ जिल्ह्यांतील ३८ तालुक्यांतून कालवा जाणार आहे. नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम व भंडारा जिल्ह्यांना या प्रकल्पाचा थेट फायदा होईल.

### नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्प नार-पार नदीजोड प्रकल्पाला दोन वर्षांपूर्वी मंजुरी देण्यात आली होती. या प्रकल्पाचा नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील दुष्काळी भागाला मोठा फायदा होईल. या पश्चिम वाहिन्या नद्यांचे अतिरिक्त पाणी गिरणा खोऱ्यात वळवून ४९,५१६ हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यात येणार आहे.

### अर्थसंकल्पात १,१५,५३० कोटींची तरतूद

### वैतरणा, उल्हास खोऱ्यातील पाणी गोदावरीत

वैतरणा आणि उल्हास हे कोकण विभागातील पश्चिमी नदीखोरे आहेत. या नद्या सह्याद्री पर्वतरांगेत उगम पावतात आणि अरबी समुद्राला मिळतात. त्यांचे पाणी गोदावरी नदीत वळवण्यात येणार आहे. या नद्यांमधील अतिरिक्त ५४.७० टीएमसी पाणी मराठवाड्यातील तुटीच्या खोऱ्यात वळवण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. ■

# इथेनॉल धोरणाचा ऊस, मका, तांदूळ उत्पादकांना फायदा

## पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळणार




**केंद्र** सरकारने १ एप्रिलपासून देशात विक्री होणाऱ्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे देशाच्या परकीय चलनात दरवर्षी सुमारे ४३ हजार कोटी रुपयांची बचत होईल आणि देशातील ऊस, मका, तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना थेट ४० हजार कोटी रुपये मिळतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

याबाबतची अधिसूचना पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नुकतीच जारी केली आहे. या निर्णयाचे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने स्वागत केले आहे. देशात प्रामुख्याने ऊस, मका, तांदूळ आणि खराब झालेल्या अन्नधान्यांपासून इथेनॉल निर्मिती केली जाते. नव्या इथेनॉल धोरणानुसार खनिज तेलाच्या आयातीत घट होऊन दरवर्षी देशाच्या परकीय चलनात सुमारे ४३ हजार कोटी रुपयांची बचत होईल आणि देशातील ऊस, मका, तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाची पातळी गाठण्यासाठी दरवर्षी सुमारे १,०१६ कोटी लिटर इथेनॉलची गरज आहे, तर अन्य सर्व प्रकारची मागणी लक्षात घेता देशाची एकूण इथेनॉलची गरज १,३५० कोटी लिटरवर जाण्याचा अंदाज आहे.

**सरकारच्या या निर्णयाने धान्य आधारित डिस्टिलरीज, मका प्रक्रिया उद्योग आणि साखर कारखान्यांना फायदा होणार आहे. बायोफ्युएल इकोसिस्टममध्ये नवीन गुंतवणूक होईल. उत्पादन क्षमतांचा विस्तार होईल. ऊस, मका आणि इतर कच्च्या मालाच्या मागणीत वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल.**

दुसऱ्या बाजूला देशाची एकूण इथेनॉल उत्पादन क्षमता नोव्हेंबर २०२५ पर्यंत १,९९० कोटी लिटरपर्यंत पोचली आहे. मात्र या इथेनॉल निर्मिती प्रकल्पात सध्या क्षमतेच्या ८० टक्के एवढेच उत्पादन करण्यात येत आहे. त्यात उत्तर प्रदेश २३६ लाख टनांसह आघाडीवर आहे. नोव्हेंबर २०२५ अखेर एकूण उत्पादनात धान्य-आधारित म्हणजे मका, तांदळापासून उत्पादित इथेनॉलचा वाटा सुमारे ८५८ कोटी लिटरसह ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. उसापासून म्हणजे साखर कारखान्यांतून उत्पादित झालेल्या इथेनॉलचा वाटा सुमारे ८१६ कोटी लिटर, तर बहु स्रोत आधारित इथेनॉल (ड्युअल-फीड) प्रकल्पातून सुमारे १३६ कोटी लिटर इथेनॉल निर्मिती झाली आहे.

भविष्यात साखर कारखान्यांतून वर्षभर इथेनॉल निर्मिती करणे शक्य आहे. इथेनॉलच्या मागणीत वाढ होईल. त्यामुळे हा निर्णय देशाला आत्मनिर्भर करणारा आणि पर्यायाने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणारा ठरणार आहे. ■

# शहरांच्या विकासासाठी भांडवली बाजारातील 'बाँड'




**महानगरपालिकांना** आपल्या विविध विकास कामांसाठी भांडवली बाजारात बॉण्ड जारी करून निधी उभारता येतो. नाशिक महापालिकेप्रमाणे 'इनोव्हेटिव्ह फंड' निर्माण करून विकासाला निश्चितच निधीचे बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बीकेसी येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये नाशिक महापालिकेच्या ग्रीन बॉण्डचे लिस्टिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'रिंगिंग बेल' वाजवून करण्यात आले.

नाशिक महानगरपालिकेने एकाच आर्थिक वर्षात प्रथम खाजगी प्लेसमेंट आणि आता सार्वजनिकरित्या असे दोन्ही म्युनिसिपल बॉण्ड जारी करून या महापालिकेने भांडवली बाजारात प्रवेश केला आहे. भांडवली बाजाराच्या माध्यमातून महापालिकांनी निधी उभा करून लोकोपयोगी कामे केली पाहिजेत. यासाठी केंद्र शासनाने योजनादेखील घोषित केली आहे. पहिल्या टप्प्यात २०० कोटी रुपयांपर्यंतचे बॉण्ड्स काढण्याकरिता केंद्राने मान्यता दिली होती. याचे यश बघता केंद्रीय अर्थसंकल्पात या बॉण्डची मर्यादा १ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याकरिता देण्यात येणारे प्रोत्साहन मूल्यदेखील २०० कोटी रुपयांपर्यंत करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी नाशिक महानगर क्षेत्रात जवळपास २५ हजार कोटींची विकासाची कामे सुरू करण्यात आली आहेत. कुंभमेळ्यासाठी करण्यात येणाऱ्या विकास कामांमुळे निर्माण होणारी व्यवस्था कुंभ साठीच नाही, तर नाशिक शहर विकसित महानगरांच्या श्रेणीमध्ये आणण्यास कारणीभूत ठरणार आहे. यामुळे पुढील काळात नाशिक हे गुंतवणुकीचे चुंबक म्हणून उदयास येणार आहे, असा आशावादही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नाशिक महापालिकेने या दोन्ही टप्प्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. केंद्र शासनाच्या प्रोत्साहन मूल्य आणि अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून नाशिक महापालिकेला बिनव्याजी पैसे मिळणार आहेत. या बॉण्डच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीद्वारे नाशिक महापालिका सार्वजनिक हिताचे पाणीपुरवठा संबंधित प्रकल्प पूर्ण करणार आहे. यामुळे पाण्याची गळती ४७ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत कमी होणार आहे. शहरी विकासातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या बॉण्डचा उपयोग होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. राज्यातील छोट्या महापालिकांमधील विकास कामे करण्यासाठी एकत्रितपणे १ हजार कोटी रुपयांचे अशाच प्रकारचे बॉण्ड भांडवली बाजारात काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ■

## बॉण्डच्या निधीतून होणारी विकास कामे

**बॉण्डमधून उभारलेला निधीचा वापर विविध पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी होणार आहे. यामध्ये मुकणे धरण पंपिंग स्टेशन येथे क्षमता वाढविणे, विल्होळी येथे नविन जलशुद्धीकरण केंद्र, विल्होळी नवीन जलशुद्धीकरण केंद्र ते साधुग्रामपर्यंत मुख्य गुरुत्व वाहिनी टाकणे आदींचा समावेश आहे. प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे कुंभमेळ्याच्या काळात तसेच त्यानंतरही नाशिक शहराला स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आहे.**



सीबीडी बेलापूर– उपस्थिती– ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर बावीसकर, मा.नगरसेवक अशोक नर्भागे, मनी कोणार, नितीन लोंढे, विनोद राय, शशिकांत गायकवाड, सुशील शिंदे, संतोष सोनार, अजय सिंह आदी.



जालना– उपस्थिती– महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, राज्य परिषदेचे सदस्य परसराम तळेकर, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, ग्रामीण तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, चिटणीस हरिभाऊ गोरे, विजय मोहिते, युवराज राठोड, गोपाल चौधरी, राजू अण्णा जाधव, ज्ञानेश्वर राठोड, कृष्णा गायके, नागेश आंबोरे, पांडुरंग गायकवाड, नारायण मोहिते, लक्ष्मण राठोड, महादेव मोहिते, धनंजय जाधव, दौलत भुतेकर, सनी राठोड, राजाराम राजे जाधव, सखाराम मोहिते आदी.



मानोरा (जि. वाशिम)– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा कविता खराट, सीमा राठोड, शुभदा नायक, संगीता इंगोले आदी.



सोयगाव– तालुका खरेदी विक्री संचालक मयुर मनगटे, तालुका उपाध्यक्ष विशाल गिरी, विजय गव्हाड, राहुल गिरी, जिल्हा चिटणीस सुनिल गावंडे आदी.



भुसावळ - वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी तांड्यावर होळी-धुलीवंदन उत्सव साजरा केला.



डोंबिवली पश्चिम- उपस्थिती- डोंबिवली पश्चिम मंडल अध्यक्षा प्रिया जोशी, जयप्रकाश सावंत, डॉ. रविना म्हात्रे, माजी विरोधी पक्ष नेते, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रकाश भोईर, सरोज भोईर, विश्वास सावंत, विजय गांवकर, संतोष वरकुटे, ओबीसी सेल अध्यक्ष गजानन ब्रह्मे, सुनील सामंत, पंकज येवले, विशाल पारखे, साधना गायकवाड, सविता गावडे, अक्षय कारभारी आदी.



नाशिक- उपस्थिती- नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनील केदार, मनपा गटनेते ॲड. श्याम बडोदे, भटके विमुक्त आघाडी जिल्हा संयोजक सिद्धेश्वर शिंदे, रवि पाटील, मंडल अध्यक्ष वसंत उशीर, विनायक कस्तुरे, विनोद येवले, अनिता भामरे, जयहिंद शिंदे, रघु भरवाड, राहुल भरवाड, हिरामण भरवाड, रनछोड भरवाड, वजु भरवाड, गोपाला भरवाड, विठ्ठल भरवाड आदी.



रायगड जिल्हा परिषदेचे नूतन अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचा सत्कार– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खा. धैर्यशील पाटील, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, आ. निरंजन डावखरे आदी.



धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष महायुतीच्या अर्चना पाटील, उपाध्यक्ष उषा गायकवाड यांचा सत्कार– उपस्थिती– आ.राणा जगजीतसिंह पाटील, ज्येष्ठ नेते सुजीतसिंह ठाकूर, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे आदी.






मुंबई– (नगरसेवक प्रशिक्षण कार्यशाळा)– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई अध्यक्ष आ. अमीत साटम, आ. योगेश सागर, महापौर रितू तावडे , मुंबई सरचिटणीस राजेश शिरवाडकर, श्वेता परुळकर आदी.





अमरावती– पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान (पश्चिम विदर्भ विभाग) उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष प्रवीण पोटे–पाटील, माजी खा. रामदास तडस, प्रदेश सरचिटणीस आ. डॉ. संजय कुटे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश प्रशिक्षण सहसंयोजक धर्मपाल मेश्राम, प्रदेश प्रशिक्षण सहसंयोजक दिनेश सूर्यवंशी, विदर्भ संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, महापौर श्रीचंद तेजवानी, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे आदी.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान



मुंबई- (मराठवाडा विभाग)- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खा. अजित गोपछडे, आ. अनुराधा चव्हाण, माजी खा. डॉ. भागवत कराड, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, चिटणीस रेखा कुलकर्णी, चिटणीस वर्षा डहाळे, प्रदेश अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी, मनोज पांगरकर, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष विश्वजीत गायकवाड आदी.




सांगली (पश्चिम महाराष्ट्र)- उपस्थिती- आ. सत्यजित देशमुख, प्रदेश उपाध्यक्ष आ. गोपीचंद पडळकर, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, संघटन मंत्री मकरंद देशपांडे, खा.मेधा कुलकर्णी, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, सांगली ग्रामीण जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, सांगली शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील, कोल्हापूर महानगर जिल्हाध्यक्ष विजय जाधव आदी.




मुंबई- (ठाणे व कोकण विभाग)- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते रघुनाथ कुलकर्णी, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, माजी आमदार नरेंद्र पवार, हेमंत म्हात्रे, प्रा. वर्षा भोसले, संतोष जनाटे आदी.




बुलढाणा– माजी नगराध्यक्ष तथा चिखली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती नंदू सवडतकर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. श्वेता महाले, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आदी.



अमरावती– काँग्रेस नेते व माजी जिल्हा परिषद सभापती बाळासाहेब हिंगणीकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रकाश भारसाकळे, आ. राजेश वानखेडे, जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर आदी.



नागद (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर)– डॉ. तृप्ती सिंह राजपूत, जिल्हा परिषद सदस्य डॉ. दिलीप सिंह राजपूत, पंचायत समिती सदस्य संतोष राठोड यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. अनुराधा चव्हाण, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, वैजापूर नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













**प्रति,**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com